Vol 5 Issue 4 Oct 2015

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

***International Advisory Board***

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

***Editorial Board***

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063

Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 4 | Oct - 2015

GRT

# लोकशाही व महाराष्ट्रातील प्रादेशीक पक्ष

*मेघराज एकनाथ औटी*
*राज्यशास्त्र विभाग, स. एस. जी. एम कॉलेज, कोपरगाव. ता. कोपरगाव, जि. अहमदनगर.*

*सारांश*



लोकशाही शासन पध्दतीत राजकीय पक्षांचे अस्तित्व अनिवार्य समजले जाते. खरे तर लोकशाही शासन व्यवस्थेच्या यशाचे गमकही राजकीय पक्षाचे असणारे अस्तित्व हेच आहे असे म्हटले तरी फारसे वागवे ठरणार नाही. कारण लोकशाही शासन व्यवस्थेत जनतेला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिलेले असते व जनतेला अभिव्यक्त होण्यासाठी वेगवेगळया कृती,कार्यक्रम देणाऱ्या व्यासपीठाची आवश्यक्ता असते. व हे व्यासपीठ राजकीय पक्षांच्या माध्यमातून जनतेला उपलब्ध होत असते. लोकशाही शासन व्यवस्था असलेल्या देशांमध्ये शक्यतो स्थिर शासन असते. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे जनतेला या व्यवस्थेत आपला अंसतोष, आपल्या विविध मागण्या व्यक्त करण्यासाठी तसेच आपल्यावरील अन्यायांचे निराकरण करण्यासाठी राजकीय पक्षांमार्फत व्यासपीठ उपलब्ध होते. व त्यामुळे बरेचसे प्रश्न शांततेच्या व समोपचाराच्या मार्गाने सुटण्यास मदत होते. त्यामुळे लोकशाही राजकीय व्यवस्थेतील राजकीय पक्षांची भुमिका खुप महत्वपुर्ण ठरते.येथील शासन यंत्रणा कार्यरत ठेवण्यात त्यांचा खुप मोठा वाटा असतो. राजकीय पक्षांच्या अस्तित्वा शिवाय लोकशाहीची कल्पना करणे देखील कठिण आहे. कारण या राजकीय पक्षांमार्फतच जनतेला सत्तेचा सोपान पादक्रांत करता येतो. आपण जर वेगवेळया देशांमधील राजकीय पक्षांचा विचार केला तर असे दिसून येते की आज या सर्व राजकीय पक्षांनी आपली स्वताःची एक विशिष्ट विचारसरणी तयार केलेली असुन या विचारसरणीला मानणारे अनूयायी तयार करण्याचे काम या राजकीय पक्षांमार्फत केले जाते व त्यांच्याव्दारे आपल्या सत्तेला अधिष्ठान मिळून देण्याचे कार्य केले जाते.

## *प्रस्तावना*

आधूनिक काळात सर्वच लोकशाही देशांमध्ये राजकीय पक्षांचे अस्तित्व आपणाला पाहावयास मिळत असले तरी प्रत्येक देशातील पक्ष पध्दतीचे स्वरुप वेगवेगळे असल्याचे दिसून येते. कारण कोणत्याही देशातील पक्षपध्दतीच्या विकासावर त्या देशाच्या ऐतिहासिक व राजकीय परंपरा, तेथिल लोकांचा जीवनविषयक दृष्टीकोन, तेथील जीवनमूल्ये, सामाजिक परिस्थिती इ. अनेक घटकांचा प्रभाव पडलेला असतो व त्यातूनच प्रत्येक देशातील पक्षांची वैशिष्टे वेगवेगळी बघावयास मिळतात.

भारताच्या संदर्भात विचार केला तर भारतात लोकशाही व्यवस्थेची स्थापना झाल्यावर राजकीय पक्षांचे महत्व व प्रभाव वाढत जाणे स्वाभाविकच होते. अर्थात, स्वांतत्र्यपुर्व काळात देखिल भारतीय राजकारणात राजकीय पक्षांनी महत्वाची भूमिका बजावली होती. भारतीय स्वांतत्र्य चळवळीचे नेत्वृवही राष्ट्रीय कॉग्रेसने केले होते. पण तेव्हा तो राजकीय पक्ष नव्हता तर एक राजकीय चळवळ होती. या कालावधीत कॉग्रेसखेरीज भारतीय कम्युनिस्ट पक्ष, हिंदू महासभा, मुस्लिम लीग, फॉरवर्ड ब्लॉक यांसारखे पक्षही स्वांतत्र्यपुर्व काळात स्थापन झाले होते. पण स्वांतत्र्योत्तर काळात मात्र येथिल राजकीय पक्षांना अधिक स्पष्ट व संघटित स्वरुप प्राप्त झाले.भारतात अनेक राजकीय पक्ष कार्य करीत असुन त्यांपैकी बऱ्याच पक्षांचा येथिल राजकारणावर स्पष्टपणे जाणवण्याइतपत प्रभाव आहे.म्हणून भारतीय पक्षपध्दतीचे वर्णन बहुपक्ष पध्दती असे केले जाते. कारण भारतीय समाजात मोठया प्रमाणावर विविधता असल्यामुळे येथे बहुपक्ष पध्दती अस्तित्वात येणे एकदम स्वाभाविक होते.त्याचप्रमाणे प्रदेशिक पक्षांचा वाढत चाललेला प्रभाव हे देखिल भारतीय पक्ष पध्दतीचे एक महत्वाचे वैशिष्टय आहे.

परंतू या संशोधन निबंधाचा मुख्य उद्येश हा महाराष्ट्रातील प्रादेशीक पक्षांचा आढावा घेणे हा आहे. त्यामुळे आपण आधी प्रदेशीक पक्ष म्हणजे काय हे समजून घेवुयात.

प्रदेशिक राजकीय पक्ष याचा अर्थ, ‘एखादया विशिष्ट प्रदेशिक विभागापुरते किंवा एखादया प्रांतापुरते मर्यादित कार्यक्षेत्र असलेल्या राजकीय पक्ष होय’. आखिल भारतीय किंवा राष्ट्रीय स्वरुपाच्या राजकीय पक्षाला संपूर्ण देशाचा विचार करुन कार्य करावयाचे असते, त्यांच्या कार्यक्षेत्राला प्रादेशीक मर्यादा नसतात. पण प्रदेशिक पक्षांच्या कार्यक्षेत्राला मर्यादा पडलेल्या असतात,

किंवा त्या मर्यादाच त्यांचे एक मुलभूत वैशिष्ट असते. अर्थात प्रदेशिक पक्ष व राष्ट्रीय पक्ष यांच्यातील फरक हा फक्त कार्यक्षेत्रापुरताच सिमीत नसतो तर त्यांच्या दृष्टीकोनातही व उदिष्टांमध्येही फरक असतो.

महाराष्ट्राच्या संदर्भात आज प्रादेशिक पक्षांचा विचार करावयाचा झाला तर शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना, रासप, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, आर.पी.आय.गट, यासारखे वेगवेगळया विचारसरणीवर आधारलेले प्रादेशीक पक्ष राजकारण करताना दिसतात. व या सर्वाचे ध्येय जरी महाराष्ट्राचा विकास करने हा एकमेव असला तरी त्यांचे मार्गमात्र भिन्नभिन्न असलेले दिसून येतात. परंतू जर आपण आज महाराष्ट्रातील या सर्व पक्षांचा आढावा घेतला तर आपणाला एक बाब नक्की निश्चितपणे जाणवेल ती म्हणजे या सर्व पक्षांच्या कृती, कार्यक्रमांना कुठेतरी एक थिजलेपण आलेले दिसून येते. आपले जनमत संघटित करण्याच्या नादात ते आपल्या मुळ विचारसरणी पासून दूर गेलेले दिसतात. त्यांनी एक संवग लोकप्रीयतेचा मार्ग निवडलेला दिसून येतो त्यामुळे आज धर्मनिरपेक्ष म्हणून ओळखले जाणारे पक्षही राजकारणासाठी धर्माचा वापर करतांना कुठलाही विधीनिषेध बाळगताना दिसून येत नाही त्यामुळे त्याची धर्मनिरपेक्षताही बेगडी स्वरुपाची वाटते.

आपण महाराष्ट्रातील काही प्रमुख राजकीय पक्षांचा धावता आढावा घेवूयात. महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वात जूना प्रादेशिक पक्ष म्हणजे 'शेतकरी कामगार पक्ष' होय. या मार्क्सवादी विचारसरणीवरती अधारलेला हया पक्षाचा सद्य स्थितीचा विचार केला तर या पक्षाचे अस्तित्व फक्त दक्षिण महाराष्ट्र व कोकणातील काही भागापुरतेच मर्यादित असलेले दिसून येते. खरे तर हा पक्ष आर्थिक व सामाजिक समतेवर आधारीत शेतकऱ्याचे राज्य स्थापन व्हावे या उद्दात हेतूने स्थापन झाला होता. पण बदलत्या सामाजिक व आर्थिक गुंतागुंतीच्या राजकारणाला सामावून घेण्यात हा पक्ष काहीसा मागे पडलेला दिसतो. कारण या पक्षाच्या वर्चस्व क्षेत्रातच आज याच मुद्दावरती शेतकरी संघटना आपले वर्चस्व वाढवितांना दिसत आहे. खरे तर या पक्षाला महाराष्ट्राच्या राजकारणात खुप चांगली संधी होती पण ते ती संधी काबीज करु शकले नाहीत. या पक्षाच्या सुरुवातीच्या काळात कॉंग्रेसच्या मा. यशवंतराव चव्हाणसाहेबा सारख्या प्रचंड जनाधार असलेल्या नेतृवाने केलेल्या बेरजेच्या राजकारणामुळे या पक्षाचा विस्तार आक्रसला गेला.

महाराष्ट्रातील शिवसेना या प्रदेशिक पक्षाचा विचार केला तर असे दिसून येते कि आज हा पक्ष संक्रमन अवस्थेत व विचारसरणीच्या बाबतीत काहीसा व्दिधा मनस्थितीत असलेला दिसतो. म्हणजे हिंदुत्व, मराठी अस्मिता कि सर्वसमावेशक राजकारण करायचे या गर्तेत सापडलेला दिसतो. याची अनेक उदा. आपणाला गेल्या काही दिवसात बघायला मिळाली. खरे तर हा पक्ष २०टक्के राजकारण व ८० टक्के समाजकारण हि भुमिका ठेवून बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केला होता. सूरुवातीच्या काळात हा पक्ष कॉंग्रेसच्या अंगाखांदयावरच वाढलेला दिसतो म्हणून सुरुवातीच्या काळात या पक्षाला वसंतसेना असेही गंमतीने म्हटले जायचे. मराठी माणसाची अस्मिता व त्यांच्या हक्कांच्या रक्षणासाठी हा पक्ष अग्रक्रमाने कार्य करताना दिसला. खरे तर या पक्षाला १९९० नतंर मंडल आयोगाच्या अंमलबजावणी नंतर महाराष्ट्रात जे काही ओबीसी राजकारण सुरु झाले व त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात जी काही सत्तेची पोकळी तयार झाली होती तीला सामावून घेण्यात हा पक्ष यशस्वी ठरला हा काहिश्या आक्रमकपणे कार्य करणारा पक्ष म्हणुन ओळखला जातो. पण बाळासाहेबाच्या मृत्यूनंतर हा पक्ष काहीसा मवाळ बनलेला दिसतो. १९९५ मध्ये या पक्षाला भाजपच्या साथीने सत्ताही मिळाली होती. पण आज महाराष्ट्रातील एक प्रमुख प्रादेशीक पक्ष म्हणून शिवसेनेकडे बघीतल्यास तो काहिसा आपयशी ठरलेला दिसुन येतो. आज महाराष्ट्रात असे अनेक प्रश्न आहेत कि त्यावर शिवसेनेने आवाज उठवायला हवा पण तसे होताना दिसत नाही. शेतमालाला योग्य बाजार भावाचा प्रश्न असेल किंवा टोल प्रश्न, स्त्रि अत्याचाराचे प्रश्न असेल या सर्व बाबतीत शिवसेनेने कुठेही आक्रमक भुमिका घेतलेली दिसून येत नाही.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र नवनिर्मान सेना या राज ठाकरे यांच्या पक्षाचा विचार केला तर त्यांनी जे बाळ ठाकरे यांनी १९६६ साली केले होते. तेच काहीसे मूद्दे घेवून आपला पक्ष स्थापन केलेला दिसून येतो.महाराष्ट्र हेच आपले कार्यक्षेत्र व ध्येय असल्याचे त्यांनी सूरुवातीलाच स्पष्ट केले आहे. या पक्षाला सुरुवातीच्या काळात तरुणवर्गांचा चांगला पाठिंबा मिळालेला दिसुन येतो. पण पक्ष वाढीसाठी संघटनात्मक बांधणी करावी लागते, कार्यकर्त्यांना सतत कृती कार्यक्रम द्यावा लागतो हे ते विसरुनच गेल्या सारखे वाटते. त्यामूळे २००६ च्या निवडणूकीत चांगले मते मिळालेला हा पक्ष २०१४ च्या लोकसभा निवडणूकीत आपल्या उमेदवाराची अनामत रक्कम सुध्दा वाचवू शकला नाही. पक्षात सर्व काही राज ठाकरे हेच सर्वेसर्वा आहेत. व्दितीय स्तरावर ते सक्षम नेतृवाची फळी उभारु शकले नाहीत व आपले स्थायी स्वरुपाचे ध्येय धोरण तयार करण्यास आपयशी ठरलेले आहे. त्यामुळे सध्यातरी राज ठाकरे यांचे वकृत्व हेच काय एकमेव या पक्षाचे सर्वात मोठे भांडवल आहे. खरे तर या पक्षाचा व शिवसेनेचा अजेंडा काही अंशी सारखाच असलेला दिसून येतो. त्यामुळे या दोहोपैकी एकाच्या ऱ्हासातच दुसऱ्याचा विकास सामावलेला दिसून आहे.

त्याचप्रमाणे महाराष्ट्रात असणारा आर.पी.आय हया पक्षाची अवस्थाची ही काही यापेक्षा वेगळी नाही. या पक्षात नेते जास्त व अनुयायी कमी अशी अवस्था दिसून येते त्याच प्रमाणे या पक्षाचे पडलेल्या विविध गटामुळेही या पक्षाची शक्ती क्षीण झालेली दिसून येते. राजू शेटटी यांच्या स्वाभीमानी शेतकरी संघटनेचा विचार केला तर ही संघटना फक्त दक्षिण व पश्चिम महाराष्ट्राच्या शेतकऱ्याच्या हितासाठीच झटताना दिसून येते त्यातही फक्त ऊस, कांदा या सारख्या नगदी पीकांच्याच भावावरुन आंदोलन करताना दिसुन येते. तसेच संपूर्ण महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांना सामावून घेण्यास हि संघटना कमी पडलेली दिसते.

यात सर्वात महत्वाचा पक्ष म्हणजे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष होय. १९९९ साली सोनिया गांधी यांच्या विदेशीच्या मुद्यावरती शरद पवार यांनी या पक्षाची स्थपना केली. खरे तर शरद पवार यांना हा पक्ष स्थापन करताना खुप मोठया पांठिब्याची आपेक्षा होती पण त्यांचा त्याबाबत भ्रमनिरास झालेला दिसुन येतो. नावालाच हा पक्ष राष्ट्रीय असून तो फक्त महाराष्ट्रापुरताच त्यातही पश्चिम महाराष्ट्रातच प्रभावशाली असलेला दिसून येतो. (सध्याच्या १६ व्या लोकसभा निवडणूकी नंतर हया पक्षाला मिळालेल्या मतसंख्येवरुन हा पक्ष राष्ट्रीय आहे कि नाही हा प्रश्न निवडणुक आयोगाच्या विचारधीन आहे.)

अश्याप्रकारे महाराष्ट्रातातील सर्व प्रादेशिक पक्षांच्या कार्याचा धावता आढावा घेतल्यास असे दिसून येते की आजपर्यन्त यापैकी कोणत्याही एका पक्षाला स्वबळावर महाराष्ट्राची सत्ता मिळविता आलेली नाही. व महाराष्ट्रातील सर्व जनतेला सामावून घेइल

असा अजेंडा देण्यात कुठेतरी कमी पडलेले दिसतात. त्यामुळे समाजातील सर्व वर्गांचा पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांना वेगवेगळया विचारसरणीच्या छोटया मोठया पक्षांना किंवा विशिष्ट जमातीच्या स्थानिक नेत्यांना हाताशी धरुन विविध घटकांचा पाठिंबा मिळवावा लागतो. व या सर्व पक्षांनी आपल्या भोवती एक परीघ आखुन घेतलेला असुन या परीघा बाहेर पडण्यास फारसे उत्सुक असलेले दिसत नाही.

महाराष्ट्रातातील या सर्व प्रादेशिक पक्षाचे ध्येय हे जरी महाराष्ट्राचा विकास करणे हे असले तरी त्या सर्वाचे मार्ग मात्र भिन्नभिन्न स्वरुपाचे असल्याचे बघायला मिळते. खरे तर आज या पक्षांना एक प्रकारचे व्यावसायीक स्वरुप आलेले बघायला मिळते. हे पक्ष म्हणजे एखादया विशिष्ट गटाच्या किंवा कुंटूबाच्या मालकीचे असलेले दिसतात. व त्यांचा कारभारही एखादया कॉपोरेट कंपनी प्रमाणे चाललेला दिसून येतो. त्यामुळे या पक्षांचे जे काही पाठीराखे किंवा कार्यकर्ते आहेत त्याच्यात व या पक्षांमध्ये एक प्रकारचा दुरावा निर्मान झालेला दिसतो. या कार्यकर्त्यांना पक्षांच्या धोरण निर्मिती प्रक्रीयेत सामावून घेतले जात नाही त्यामुळे तेही या पक्षांविषयी फरसे एकनिष्ठ राहिलेले दिसत नाही. आज पक्षकेंद्रीत राजकारण मागे पडून व्यक्तीकेंद्रीत राजकारण बघायला मिळते त्यामुळेही या पक्षांचे महत्वही कमी होताना दिसते आहे. आज हे पक्ष भावनीक स्वरुपाचे राजकारण करण्याच्या नादात जनतेमध्ये एक प्रकारची दुफळी तयार करण्याचे कार्य करत आहेत. आज राज्यात विकासाच्या राजकारणा ऐवजी लोकानुनयी राजकारण होताना दिसते आहे. आज राज्यातील सर्व राजकीय पक्षांच्या अजेंडयावर विकासाच्या मुद्दयाऐवजी जातिय आरक्षण, धर्मिक अस्मिता, मंदिर या सारखे मुद्दे आहेत. त्याच प्रमाणे आज राज्यातील सर्व राजकीय पक्षांनी देशातील महापुरुषांच्या विचारांचा खुन करुन त्यांचे प्रतिमीकरण केले आहे. आता महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतंत्र विदर्भाचीही मागणीही पुढे येताना दिसते आहे. हि मागणी जरी आर्थिक असमतोलाच्या मुद्यावरती केली जात असली तरी कुठेतरी आपली वाटचाल विभाजनवादाकडे तर होत नाही ना यांची निश्चितच दखल सर्व राजकीय पक्षानी घेणे आवश्यक आहे.

*संदर्भ –*

१.कुलकर्णी सुहास, चंपानेरकर मिलिंद. 'असा घडला भारत', रोहन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २०१३.
२.व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास, (अनुवाद-लेले चित्रा.) ' भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार'. डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम मराठी आवृत्ती २०१०.
३.सुहास पळशीकर,'राजकारणाचा ताळेबंद भारतीय लोकशाहीची वाटचाल'साधना प्रकाशन पुणे. आवृत्ती पहिलीः १५ ऑगस्ट २०१३.
४.डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे. 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण' पिंपळापुरे प्रकाशन, नागपुर. दुसरी आवृत्तीः मार्च २०१०.
५.लोकात्ता, सकाळ, लोकमत, व महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रांमधील या विषयीचे महत्वपुर्ण लेख.
६.सिरसीकर.व.मं., 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण',कॅान्टिनेन्टल प्रकाशन,पुणे.प्रथम आवृत्ती १मे २००१.
७.पळशीकर सुहास व नितिन बिरमल (संपा) 'महाराष्ट्राचे राजकारणः राजकीय प्रक्रीयेचे स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन पुणे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org